ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ‘तहान’ मधील पाणीटंचाई आणि जीवन संघर्ष

प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बार्शीटाकळी, जि.अकोला

**प्रास्ताविक :**



ग्रामीण साहित्याने साठोत्तरी कालखंडात आपल्या वेगळेपणाने ग्रामीण साहित्याची वेगळी वाट निर्माण केलेली आहे. एकूणच मराठी साहित्याच्या अवकाशात आमुलाग्र स्वरूपाचा बदल घडवून आणण्याचे काम ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाने केलेले आहे. कथा, कविता, कादंबरी साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारात ग्रामीण जीवनानुभव अत्यंत नेमक्या पद्धतीने प्रतिबिंबित झालेले आहेत. या साहित्यप्रकारात कादंबरी ने ग्रामीण जीवनाला खऱ्या अर्थाने समग्रतेने व्यापून टाकलेले दिसते. साठोत्तरी काळात ज्या ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तव आणि परिपूर्ण प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. आजवर मराठी साहित्याला अपरिचित असणाऱ्या जीवन वास्तवाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण कादंबरी प्रकट झाल्यामुळे ती वाचकांच्या पसंतीस उतरलेली दिसून येते.

ऐंशीनंतरच्या कालखंडात ग्रामीण कादंबरी अत्यंत वेगवेगळ्या अंगानी विकसित होत गेली. बदलत्या ग्रामीण महाराष्ट्राचा नेमका वेध घेणारे अनेक ग्रामीण कादंबरीकार या काळात निर्माण झाले. वेगवेगळ्या भू प्रदेशाचे प्रतिनिधित्व करणारे हे ग्रामीण कादंबरीकार आपल्या सभोवतालच्या ग्रामीण वास्तवाचे नेमके चित्र अत्यंत कलात्मकतेने कादंबरीतून साकार करताना दिसतात. या कादंबरीकाराच्या पिढीतील एक महत्त्वाचे कादंबरीकार, कथाकार, कवी सदानंद देशमुख यांनीही आपल्या एकूणच साहित्य लेखनातून विदर्भातील ग्रामीण जीवनाचे महत्त्वपूर्ण चित्रण केलेले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनातील एक महत्त्वाची कादंबरी म्हणून तहान कादंबरीचा नामोल्लेख अवर्जून करावा लागतो. तहान मधून साकार झालेल्या जीवन चित्रणाची विविधांगे विचारात घेताना ‘पाणी’ या विषयाला केंद्रस्थानी ठेवून त्याभोवती वलयांकित झालेल्या जीवन संघर्षाचे नेमके चित्र प्रस्तुत शोधनिबंधाच्या रूपाने स्पष्ट करता येईल.

मानवी जीवन हा एक संघर्षाचा पट आहे. त्यात पावलोपावली माणसाला निसर्गाशी, परिस्थितीशी, प्रवृत्तीशी, संस्कृतीशी, नैतिकतेशी, विचारप्रवाहाशी, बदलांशी वारंवार संघर्ष करावा लागतो. संघर्ष हा मानवी जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. या संघर्षाला सामोरे जाणारी माणसं तहान कादंबरीतून नेमकेपणाने साकार होतात. म्हणून संघर्ष हा मानवी जीवनात खऱ्या अर्थाने महत्त्वाचा ठरतो. सदानंद देशमुख यांनी तहान कादंबरीतून मानवी संघर्षाची वेगवेगळी रूपे नेमकेपणाने साकार केली आहेत. या कादंबरीच्या आशयातून साकार होणाऱ्या जीवन चित्रणाला आणि मानवी प्रवृत्तीला शब्दबद्ध करताना डॉ.आशा सावदेकर लिहितात, ‘‘सदानंद देशमुख या तरुण लेखकाच्या तहान या कादंबरीचे स्वरूप असेच व्यामिश्र आहे. पाण्यावाचून तळमळणारे ग्रामीण जीवन हा या कादंबरीचा गाभा नाही. माणसे तहानेने व्याकूळ होतात, पाण्यासाठी तळमळतात, त्याहीपेक्षा जास्त तडफड होते ती भौतिक सुखाच्या मायावी मृगजळा मागे

धावणाऱ्या तरुण मनाला पाहताना. त्यात धडपडीची आणि त्यातून मागल्या पिढीच्या वाट्याला येणाऱ्या घुसमटीची कहाणी म्हणजे 'तहान'.''[१] सावदेकर यांनी तहान मधील संघर्षाची विविधात्मकता नेमकेपणाने अधोरेखित केलेली आहे.

तहान कादंबरीतून साकार झालेली पाणीटंचाई मानवी जीवनाच्या विविध संघर्षाचे मूळ कशी ठरते, हेही या कादंबरीतून नेमकेपणाने साकार होते. पाणीटंचाई आणि दुष्काळ याही पलीकडे जाऊन, माणूस भौतिक सुखाच्या आहारी कसा जातो आणि त्यातून त्याच्या वाट्याला वेगवेगळे संघर्ष कसे उभे राहतात, त्याचे नेमके वास्तव या कादंबरीतून साकार होते. म्हणजेच बदलत्या जीवन वास्तवाने ग्रामीण जीवनाचे रूपच पालटून टाकले आहे. ते केंद्रस्थानी ठेवले आहे. पाणीटंचाई हा खरेतर माणसाच्या आयुष्यातील एक जीवघेणा संघर्ष आहे. परंतु, या जीवघेण्या संघर्षालाही पचवून भौतिक सुखाच्या पायी निर्माण होणाऱ्या दोन पिढीतील संघर्षाचे स्वरूप जेव्हा लक्षात येते, तेव्हा खऱ्या अर्थाने आधुनिकीकरणाने मानवी समाज चंगळवादी प्रवृत्तीकडे कसा झुकत चालला आहे, ते पाहावयास मिळते. या कादंबरीतून साकार झालेले हे जीवन वास्तव विचार प्रवृत्त करायला लावणारे आहे. या कादंबरीतून साकार झालेल्या प्रत्येक पात्राच्या अंत:करणात जीवन संघर्षाची आणि ताणतणावाची जाणीव लेखकाने ओतप्रोत भरलेली आहे. लेखकाच्या अभिव्यक्तीचे वेगळेपण अधोरेखित करताना द.ता.भोसले म्हणतात, ''तहान कादंबरीच्या प्रत्येक पात्राच्या अंत:करणात दडपून ठेवलेले अभिलाषेचे एक स्वप्न आढळते. प्रत्येकानं जोपासलेल्या या स्वप्नामुळे राघोजीचं कुटुंब जसं सजीव आणि प्रत्ययकारी झाले आहे तशीच कथानकाला गतिमानता लाभलेली आहे. त्यातून मानवी स्वभावाचे कंगोरे ही प्रत्ययाला येतात आणि एकूण कादंबरी मग स्वप्नांचं आभाळ आणि वास्तवाची जमीन यांच्या सामीप्यासाठी धडपडणारी कहाणी वाटते. आपले स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक पात्र जी धडपड करते, त्यातून नात्यातील ताण निर्माण होतो.''[२] भोसले यांनी तहान कादंबरीतून साकारलेल्या व्यक्तिरेखांच्या अंतर्मनात निर्माण होणारी संघर्षाची वेगवेगळी रूपे नेमकेपणाने अधोरेखित केलेली आहेत. कादंबरीतून साकार होणारा विदर्भाच्या ग्रामीण जीवनाचा अवकाश आणि या अवकाशाला भोगणारी माणसं अशा स्वरूपात या कादंबरीतील जीवनसंघर्ष प्रतिबिंबित होतो.

ऐंशी नंतरच्या काळात एकूणच मानवी समाज जीवनात अमुलाग्र स्वरूपाचे बदल झाले. आधुनिकतेचा शिरकाव ग्रामीण जीवनात मोठ्या प्रमाणात झाला. त्याचा पहिला आघात झाला तो ग्रामीण संस्कृतीवर. पारंपरिकतेला छेद देऊन नव्या आणि तकलादू जीवनशैलीचा अंगीकार करण्याची प्रवृत्ती बळावत गेली. परिणामत: आधुनिकता आणि पारंपरिकता यामध्ये संघर्षाची ठिणगी पडली. या संघर्षाला देशमुखांनी तहान मधून अत्यंत वास्तवाच्या पातळीवर उभे केले आहे. एकूणच तहानच्या रूपाने मानवी जीवन उध्वस्त होत जाण्याची व्यथा तर साकार होतेच पण बरोबरीने एकूणच पारंपारिक संस्कृतीचाही विनाश होत चालल्याची खंत प्रतिबिंबित होते. तसेच मानवतावादी मूल्यांचा ही ऱ्हास होत चालल्याची खंत व्यक्त होते. या कादंबरीतील विशेषावर प्रकाश टाकताना प्रा.लक्ष्मीकांत येळवंडे लिहितात, ''कादंबरीच्या कथानकातील सुरुवातीचा भाग मूल्यात्मक दृष्टीने अधिक महत्त्वाचा वाटतो. पाणी विकून पैसे मिळवता येतात व दुसऱ्यांचे बैल तो चढ चढत नाही, याबद्दल बबनला आनंद वाटतो. पिराचा चढ असल्यानेच आपल्याला या गोष्टी मिळू शकतात. म्हणून चढ असणे ही बबनला लाख रूपयाचं वाटते. म्हणजेच कोणतीही गोष्ट केवळ आपल्याला मिळावी, हा समाजाचा स्वार्थी हेतू प्रकट होतो. पाणी दिल्याने पुण्य होते असे मानणाऱ्या संस्कृतीतील बबनच्या मनातील विचार म्हणजेच मानवतावादी मूल्य कशी कमकुवत झाली आहे, याचे प्रत्यंतरच आहे.''[३] येळवंडे यांनी कादंबरीतून साकार झालेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचा होणारा ऱ्हास कशा पद्धतीने प्रतिबिंबित होतो ते स्पष्ट केले आहे. बबनच्या रूपाने साकार होणाऱ्या आजच्या तरुणांची मानसिकता ही विचारप्रवृत्त करायला लावणारी आहे.

पाणी या प्रश्नाभोवती निर्माण झालेल्या संघर्षाची वेगवेगळी रूपे या कादंबरीतून सदानंद देशमुख यांनी अत्यंत नेमकेपणाने मांडलेली आहेत. पाण्याचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करतानाच या समस्येभोवती मानवी समाजजीवनाला येत चाललेला तकलादूपणा हा या कादंबरीच्या निर्मितीमागील मूळ हेतू असलेला दिसून येतो. अवर्षण निर्माण होऊन उद्भवलेली परिस्थिती किती जीवघेणी होती याचे तहान मधून आलेले वर्णन दुष्काळाची तीव्रता अधोरेखित करणारे आहे. ''शिवारात उन्हाची धग उठली होती. धगव्यानं सारं रान होरपळून निघत होतं. दूरवर क्षितीजाकाठाशी मृगजळाच्या लाटा लहालहा करत धावत

होत्या. भोवताली झाडांची पाने झडलेली. चुकत माकत एखादं आंब्याचं किंवा नव्यानं शिवारात उगवून आलेली चंदनाची झाडी तेवढी हिरवळ होऊन उभी होती.''४ अवर्षणाने आणि उद्‌भवलेली परिस्थिती तहानमधील या निवेदनावरून लक्षात येते.

अशा अवर्षणग्रस्त भागात जीवन जगणाऱ्या माणसांच्या जगण्यात उद्‌भवणाऱ्या संघर्षाची वेगवेगळी रूपे प्रस्तुत कादंबरीतून अनेक व्यक्तिरेखांच्या रूपाने पहावयास मिळतात. या कादंबरीत साकार झालेल्या बबन, राघोजी, रामकोर, रत्ना अशी प्रमुख पात्रे तर यांच्याबरोबरीने कथानकात पानापानावर आढळणारी इतर दुय्यम पात्रे कादंबरीच्या कथानकातील आशयाला ठळक करणारी आहेत. या पात्रांच्या अभिव्यक्तीतूनही तहानमधील पाणी संघर्ष आणि जीवनसंघर्ष नेमकेपणाने वाचकांच्या समोर उभा राहतो. डॉ.रवींद्र ठाकूर यांनी तहानमधून साकार झालेल्या पाणी संघर्ष आणि जीवन संघर्ष या एकाच नाण्याच्या दोन बाजू कशा आहेत ते नेमकेपणाने अधोरेखित केले आहे. ते म्हणतात, ''पाणीटंचाईमुळे लोक हैराण झालेले असतात. परंतु बबन शेवाळे याला ती पैसे मिळवून देणारी पर्वणी वाटते. पाणी विकून तो भरपूर पैसे मिळवू लागतो. लोकांना पाण्याची तहान लागली आहे तर बबनला पैशाची तहान लागली आहे. त्यापुढे तो इतरांची पर्वा करत नाही. चालून आलेल्या भरपूर संपत्तीमुळे बबन गैरवर्तन करू लागतो. शेवटी त्यामुळे त्याची व त्याच्या कुटुंबाची वाताहत होते. ही तहान फक्त पाण्याची नाही. बबनला आणि त्याच्या आईला पैशांची तहान लागली आहे तर कोणाला मायेची तहान लागली आहे. तर कोणी आपली सुडाची तहान भागवू पाहतो आहे. असा बरकत नसलेला धंदा करणं चांगलं नाही अशी बबनच्या बापाची राघोजीची भावना आहे. परंतु बबन आणि बबनची आई रामकोर त्याचं चालू देत नाहीत.''[५] ठाकूर यांनी तहानमधून साकार झालेला पाणी संघर्ष आणि जीवन संघर्षाची नेमकी उकल केलेली दिसून येते. म्हणूनच सदानंद देशमुख यांची ही कादंबरी तत्कालीन सामाजिक वास्तवाचे नेमके आकलन करून देणारी कादंबरी ठरते असे म्हणता येते.

## समारोप :

शेवटी सारांश रूपाने असे सांगता येते की, ८० नंतरच्या काळात एकूणच समाजाच्या जीवनात आमूलाग्र स्वरूपाचा बदल झाला. परंतु या बदलाला स्वीकारत असताना माणसांच्या कृती उक्तीत प्रचंड स्वरूपात उलटापालट होत गेली. त्यातून माणसाला वेगवेगळ्या संघर्षाला सामोरे जावे लागले. ही परिस्थिती एकूणच जीवघेण्या स्वरूपाची कशी ठरत गेली, ते तहान मध्ये प्रत्ययकारीतेने साकार झालेले दिसून येते.

## संदर्भ :

१. डॉ.आशा सावदेकर, कादंबरीचा आशयवेध, विजय प्रकाशन, नागपूर प्र.आ.२०१३, पृष्ठ २०४.
२. डॉ.द.ता.भोसले, साहित्य : आस्वाद आणि अनुभव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई प्र.आ.२०१२, पृष्ठ १७८, १७९.
३. प्रा.लक्ष्मीकांत येळवंडे, सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या : एक आकलन, स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ.२००७, पृष्ठ ६३.
४. सदानंद देशमुख, तहान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००४, पृष्ठ १.
५. डॉ.रवींद्र ठाकूर, मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वि.आ.२००१, पृष्ठ १८०.